**महाराष्ट्र शासन**

उच्च शिक्षण संचालनालय

**शिक्षण शुल्क समिती,मुंबई**

( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)

कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,

१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१

E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org


## ठराव

दि.०४.०१.२०१९ रोजी सायं.०७:०० वाजता मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय तथा मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांच्या दालनात मा. उपसचिव, मशि, मंत्रालय, मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म.रा. पुणे, सहसंचालक, शिक्षण संचालनालय, पुणे व सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांच्या उपस्थितीत महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसंदर्भात झालेल्या चर्चेत पुढीलप्रमाणे ठराव घेण्यात आले.

१. शुल्क नियामक प्राधीकरणाप्रमाणे, ज्या महाविद्यालयांचे सन २०१६–१७ व २०१७–१८ चे शिक्षण शुल्क निश्चित नाही, अशा महाविद्यालयांना त्यांना शिक्षण शुल्क समितीच्या ठरावानुसार सन २०१५–१६ मध्ये मंजूर असलेले अंतिम शुल्क महाडीबीटी पोर्टलवर मंजूर करून देण्यात यावे.

२. जी महाविद्यालये शिक्षण शुल्क समिती या कार्यालयात शिक्षण शुल्क निश्चितीसाठी कधीच आलेली नाहीत किंवा ज्यांनी सन २०१५–१६ किंवा त्यापुढील शुल्क निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करून घेतलेली नाही, अशा महाविद्यालयांनी शासकीय व अनुदानित अध्यापक महाविद्यालयांना (शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमासाठी–शा.नि. उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.१९.०९.२०१६ व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमासाठी–शा.नि.उच्च व तंत्र शिक्षण विभाग.दि.२७. १०.२०१६ नुसार बी.एड. शिक्षण शुल्क–प्रथम वर्ष –रू.१०३७०/– व्दितीय वर्ष–रू.१०३७०/–व बी.पी.एड. शिक्षण शुल्क–प्रथम वर्ष –रू.३०००/– व्दितीय वर्ष–रू.३०००/–) लागू असलेले शुल्क महाडीबीटीवर मंजूर करून दयावे. असा ठराव झाला.

(स्वाक्षरी)

सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती तथा
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

हा निर्णय पहिल्या वर्षासाठी आहे दुसऱ्या हप्ता देण्यापूर्वी विभागीय सहसंचालकांमार्फत तपासणी करावी.

(स्वाक्षरी)

अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई